नाविण्यपूर्ण बाजार यंत्रणा

Bankey Bihari, Lakhan Singh, Rajesh Bishnoi and Suresh Kumar

आजही आपल्या देशात दुर्गम, डोंगराळ, प्रदेशातील लहान शेतकरी केवळ योग्य बाजार यंत्रणेशी संपर्क नसल्याने शेतीवर आधारित असलेले आपले जीवन समाधान कारक जगु शकत नाही. मात्र उत्तराखंड मधील डेहराहून जिल्हातील चक्रता या दुर्गम भागातील शेतकऱ्यांनी विशिष्ट प्रकारची स्थानिक बाजार यंत्रणा उभी केली आहे. ही प्रणाली यशस्वी झाली व ती टिकाऊ पण आहे.

उत्तराखंड मधील डोंगराळ भागात सुमारे ८०% शेतकरी अल्प व अत्यल्प भुधारकाच्या श्रेणी मध्ये बसतात. एकंदर भौगोलीक क्षेत्राच्या केवळ १२% जमीन पिकाखाली आणण्याच्या योग्यतेची आहे. व त्या पैकी ५०% जमीन ही कोरडवाहू /वर्षाआधारीत आहे. अशा वेळी येनारा पाऊस, कुठे कमी तर कुठे जास्त हे एक प्रकारचे त्यांच्यासाठी संकटच असते. हिवाळा व उन्हाळा तर यांच्यासाठी भिषणच असतो. या दिवसात पाणी अगदी लहान नाल्यामधून कमी प्रमाणात वाहत असते. हेच पाणी प्रामुख्याने घरगूती वापरासाठी वापरले जाते तसेच क्वचित पिकासाठी पण वापरले जाते तशी हवामान परिस्थीती अनुकुल असल्याने अगदी जुजबी संसाधानासह गैर हंगामात भाजीपाल्याचे उत्पादन काही शेतकरी घेतात. परंतू प्रत्येकजण अगदी छोटया प्रमाणातच उत्पादन घेतात. टोमॅटो, शिमला मिरची, हिरवी मिरची, भेंडी अथवा इतर पालेभाज्या हया प्रत्येक ५ ते २० कीलो या प्रमाणात होतात. बटाटे, अद्रक, मटार, दुधी भोपळे,साधे भोपळे, गाजर, मुळा अशा प्रकारच्या भाज्या २०ते १०० किलो पर्यंत उत्पादन काढतात. डोंगराळ भागातून बाजार पेठे पर्यंत भाजीपाला वाहून नेने खर्चीक असल्याने शेतकरी आपापले उत्पादन स्थानिक परिसरातच विकतात. त्यांच्यामुळे त्यांना चांगला भाव मिळत नाही. खरं तर स्थानिक बाजारपेठ नसतेच मुळी आणि त्यामुळे अशी उत्पादने मोठया प्रमाणावर व्यावसायीक लागवड करण्याचा विचार ही करू शकत नाहीत.

योग्य बाजारपेठ व पोहोच नसल्यामुळे डोंगराळ भागातील शेतकरी व्यावसायी भाजी उत्पादनाच्या भानगडीत पडत नाहीत.

उत्तराखंडच्या डेहराहून जिल्हातील जौनसर विभाग व त्याला लागून असलेल्या हिमाचल प्रदेश मार्फत सिरमौर विभाग येथील श्रीमंत शेतकरी व त्यांच्या कुटूंबातील मंडळी, किंबहूना पूर्ण गावच नजीकच्या मंडी मध्ये घाऊक खरेदी विक्रीचे एजंट म्हणून गेली



विपणनासाठी युटिलीटी व्हॅनचा वापर

अनेक पिढ्या प्रस्तापित झाले आहेत. अनेक वर्षाच्या ओळखीमुळे परिसरातील शेतकऱ्यांचा या मंडळीवर एक प्रकारचा विश्वास बसला आहे. आपल्या शेतमालाची विक्री कृषी लागती साठी लागणारे साहित्याची खरेदी आणि अगदी गरजेच्या वेळी लागणारी उदारी या बाबीत येथील शेतकरी या एजंट वर विसंबून असतात. पूर्वी शेतकरी आपला माल गाढवांच्या पाठीवर वाहून नेत असत. कारण या भागात रस्तेच नव्हते. अगदी छोटया मोठया सामानासाठी ग्रामस्थाना खूप लांब चालत जावे लागायचे. स्वत:चा शेतमाल घेऊन बाजारात विक्रीसाठी जाणे हे लहान शेतकऱ्यांसाठी दूरापास्त होते.

गेल्या २०-२५ वर्षात रस्त्यांची सुधारणा झाल्यामुळे दररोज किमान २-३ युटिलीट व्हॅन्स गावात येजा करतात. उतराखंडमधील साहिया विकासनगर व डेडराहून तसेच हिमाचल प्रदेश मधील नादान या ठिकाणी परिसरातील गावाना जोडणाऱ्या १६० ते १७० अशा युटीलीट व्हेन्स दररोज ये-जा करीत असतात. दुपारच्या अगोदर या व्हॅन्स येथे पोहोचतात व दुपारनंतर परत गावा गावाकडे रवाना होतात. या व्हॅन्स मुळे गावातील शेतकऱ्यांना बाजारात पोहोचणे शक्य झाले. त्यांना बाजार जवळ झाले. या मध्ये प्रथम हे शेतकरी त्या संबधित बाजारपेठेत ठराविक शेत मालाचा काय भाव आहे ते



युटीलीट व्हॅन्सचे ड्रायव्हर हेच खरे नाविण्यपूर्ण बाजार यंत्रणेचे उत्प्रेरक आहेत. घाऊक एजंट बाजारात मालाचे वजन करुन तश्या पावत्या देतात





युटिलीटी व्हॅन्समुळे शेतकऱ्यांची गतीशीलता वाढली व त्यांची बाजाराशी पोहोच वाढली.

तेथील एजंट कडून फोन वर समजून घेत. व त्या आधारावर भाजी पाल्याची काढणी करून बाजारात युटीलिटी व्हॅन मधून पाठवून देत. एक किंटल व त्या पेक्षा कमी वजनाच्या बॅगामध्ये भाजीपाला पॅकींग करून त्या प्रत्येक बॅगेवर शेतकऱ्याचे नाव, गाव व ज्या एजंटला घायचे त्या एजेंटचे नाव देखिल लिहितात. ज्या शेतकऱ्याच्या जास्त बॅग असतात. तो शेतकरी त्या युटिलीटी व्हॅनमधून बाजारात जातो. पण ज्यांच्या १-२ बॅगा असतात ते युटिलीटी व्हॅन च्या ड्रायव्हरकडेच सोपवून देतात. गाडी बाजारात आल्यावर ड्रायवर संबंधित भाज्यांचे गाठोडे संबधित एजंटकडे सुपूर्त करतात. मग ते एजंट प्रत्येक बॅगेचे वजन करून त्या बॅगेवर लिहितात व बाजारभावा प्रमाणे त्याचे किती पैसे होतात ते देखिल त्यावर लिहीतात. तसी पावती तयार करून संबधित शेतकऱ्यांच्या नावाने ते युटिलिटी व्हॅनच्या ड्रायव्हर कडे देतात. ड्रायव्हर संबधित शेतकऱ्याला त्या पावत्या देतात. त्याचवेळी भाजीच्या बॉगा वाहून नेण्याचे भाडे देखिल त्या शेतकऱ्या कडून वसूल करतात. दोन किलो पेक्षा कमी वजन असलेल्या बॅगचे पैसे ड्रायव्हर घेत नाहीत. शेतकरी अशा पावत्या जमा करून ठेवतो व आठवडयातून एकदा किंवा महिण्यातून एकदा बाजारात जाऊन त्या एजंटकडून आपले पैसे घेऊन येतो.

बाजार यंत्रणा

↓

शेतकरी मालाची बाजारातील किमंत एजंटकडून फोनवर समजून घेतो.

↓

बाजारातील किमतीनुसार शेतातील भाजीपाला काढला जातो.

↓

वाहून नेण्यासाठी मालाचे पॅकींग केले जाते.

↓

युटिलीटी व्हॅन ड्रायवरकडे सोपविले जाते.

↓

ड्रायव्हर घाऊक व्यापाऱ्याकडे एजंटकडे सोपवतो

↓

वजन केले जाते.

↓

एजंट नाव, वजन न पैसे नमूद असलेली पावती ड्रायव्हर ला देतो.

↓

गावात पोहोचल्यावर ड्रायव्हर संबधित शेतकऱ्याला पावती देतो.

↓

आठवड्यातून / महिन्यातून एकदा शेतकरी बाजारात जाऊन पैसे एजंट कडून घेतो.

गरजेनुसार काही शेतकऱ्यांचे पैसे एजंटकडून घेणे व त्या शेतकऱ्यांचे काही घरगूती सामान बाजारातून विकत घेणे हे काम काही वेळा ड्रायव्हर करतात. अगदीच कीरकोळ सामानासाठी शेतकऱ्याना ड्रायवरला काही द्यावे लागत नाही. पण बऱ्यापैकी सामान /मोठा बाजार असेल तर त्याचे भाडे व हमाली मात्र ड्रायव्हरला द्यावी लागते. खर तर हा नाविन्य पणा अशा डोंगराळ प्रदेशात राहणाऱ्या शेतकऱ्यांसाठी एक वरदानच आहे. या व्दारे प्रत्यक्षात स्वत:बाजारात न जाता त्यांची कामे होतात. त्यासाठी वेळ व पैसा द्यावा लागत नाही.

तात्पर्य

ही नाविन्यपूर्व बाजार यंत्रणा डोंगराळ भागातील शेतकऱ्यासाठी वरदान ठरली. ही यंत्रणा कार्यक्षम व परिणाम कारक आहे. शेतकऱ्याना प्रत्येक वेळा आपला माल विकण्यास बाजारात जावे लागत नाही. पैसा व वेळ यांची बचत होते.

या यंत्रणेचे खास वैशिष्ट म्हणजे मोठया शेतकऱ्यांच्या सोबतच अगदी छोटया व लहान शेतकऱ्यांना सुद्धा अगदी कमी शेतमाल बाजारात नेता येतो. फार मोठं काही तंत्रज्ञान नसलेली ही बाजार यंत्रणा मात्र चालते ती केवळ शेतकरी ड्रायव्हर व बाजारातील घाऊक व्यापारी / एजंट याच्या एक मेकाच्या भरोशावर व विश्वासावर खर तर अशा प्रकारच्या स्थानिक, नाविण्यपूर्ण व्यवस्था जागोजागी व्हायला हव्या कि जेणे करून शेतकऱ्यांचे जीवन सोपे व फायदेशीर होईल.

Bankey Bihari
Principal Scientist (Agri. Extension) & I/C Head (HRD&SS)
Email : biharibankey_bankey@yahoo.co.in

Rajesh Bishnoi
Scientist (Agri. Extension)Email : rajesh3017@gmail.com

Suresh Kumar
ACTO (Agril. Extension) Email : sureshiiswc@gmail.com
ICAR-Indian Institute of Soil and Water Conservation
218-Kaulagarh Road, Dehradun (Uttarakhand)

Lakhan Singh
Director, ICAR-ATARI, Pune Email : lakhanextn@gmail.com

मराठी अनुवाद - श्री. दत्ता पाटील, युवा रुरल असोसिएशन, नागपूर

Source : *Innovative market mechanism, LEISA India, December, 2018*